दै. देशोन्नती दि-09/12/2019

# 'मोक्का' गुन्ह्यातील टोळी प्रमुखाच्या मुसक्या आवळल्या

## दिलीपसिंघ कॉलनीत केला होता गोळीबार, 'स्थागुशा'ने केली अटक

**नांदेड** ▪ प्रतिनिधी

आपसातील वादातून दिलीपसिंघ कॉलनीत ५ सप्टेंबर रोजी रात्री गोळीबार केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करुन मोक्का लावल्यानंतर फरार झालेल्या या टोळीतील प्रमुखाच्या स्थानिक गुन्हे शाखेने ८ डिसेंबर रोजी दुपारी रेल्वे स्थानक परिसरात मुसक्या आवळल्या.

दिलीपसिंघ कॉलनीत आपसातील वादातून ५ सप्टेंबर रोजी रात्री गोळीबार करुन काही तरुणांनी दहशत निर्माण केली होती. यावेळी पोलिसांनी शेख अनवर अली अखबर अली व प्रदिप उर्फ सोनू रोत्रे या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेवून त्यांच्याकडून पिस्तोल व काडतूस जप्त करुन त्यांना ताब्यात घेतले होते. या प्रकरणी वजिराबाद पोलिसांनी पोकॉ संतोष बेलूरोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कलम ३०७, ३४ भादविंसह कलम ३/२६ व २७ भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता. परंतू यामध्ये समावेश असलेला कलम यादव हा मात्र फरारच होता.

दरम्यान पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर, अप्पर पोलिस अधिक्षक दत्ताराम राठोड यांनी सदरील फरार झालेला आरोपी कमल यादवचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर यादव हा ८ डिसेंबर रोजी रेल्वे स्थानक परिसरात दुपारी असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.

आरोपींविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमाचे कलम समाविष्ठ करण्याबाबतचा प्रस्ताव वजिराबाद ठाण्याचे पोनि संदिप शिवले यांनी पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर यांच्या मार्फत पाठविला होता. यामध्ये विशेष पोलिस महानिरीक्षक यांनी कलम समाविष्ट करण्याची परवानगी दिल्याने. महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ प्रमाणे समाविष्ट करुन उपविभागीय पोलिस अधिकारी अभिजीत फस्के यांच्याकडे पुढील तपास सोपविण्यात आला.

या माहितीवरुन स्थागुशाचे पोनि शिवाजी डोईफोडे यांच्या सूचनेनुसार सपोनि सुनिल नाईक, पोउपनि प्रविण राठोड, पोकॉ राजु पुल्लेवार, रविकुमार बाबर, मोतीराम पवार, तेलंग यांनी मोक्का प्रकरणातील मुख्य आरोपीस जेरबंद केले. या प्रकरणात यापुर्वी अटक केलेले ४ आरोपी औरंगाबाद कारागृहात आहेत.

पोलिसांच्या चौकशी अंती यातील आरोपींनी कट कारस्थान रचून त्यांच्या टोळीचा मटक्याचा अवैध जुगार व्यवसाय जिल्ह्यात सुरळीतपणे चालवावा व दुसऱ्या कोणत्या मटका व्यवसायीकांच्या टोळ्या निर्माण होवून अवैध व्यवसायात स्पर्धा निर्माण होवू नये; यासाठी त्यांची शहरात दहशत निर्माण राहावी तसेच वादातील जमीनाचा ताबा करण्याचा अवैध व्यवसाय सुरळीत चालावा, या उद्देशाने टोळी तयार करुन घातक शस्त्राचा वापर करुन सदर गोळीबाराची घटना घडवून आल्याची माहिती चौकशी अंती पुढे आली.